


महात्मा फुले शिक्षण संस्थेचे

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण–इस्लामपूर

ता.वाळवा, जि. सांगली

# कर्मवीर वार्ता

(तिमाही अंक)

▪ २२ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ ▪ वर्ष पहिले : अंक दुसरा ▪ पृष्ठे : चार


## कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सप्ताह संपन्न



महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील (काका) यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस माल्यार्पण. समवेत मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. डी. बी. पाटील व ॲड. महेश पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील व प्राध्यापकवृंद



कर्मवीर जयंती सप्ताहानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमध्ये पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांसह प्रमुख अतिथी डॉ. रणधीर शिंदे ,संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, संस्थेचे सदस्य मा. डी. बी. पाटील, ॲड. सतीश पाटील, स्मिता पाटील व प्राचार्य डॉ. नितीन शिंदे व अन्य.

महात्मा फुले शिक्षणसंस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये दिनांक २१ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२४ या कालावधीदरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ व्या जयंतीप्रित्यर्थ कर्मवीर जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कॉलेजमध्ये अनेकविध उपक्रम घेण्यात आले. ते पुढीलप्रमाणे–

१) दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी 'कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन व कार्य' याविषयावर अनेक संदर्भ ग्रंथांचे प्रदर्शन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ग्रंथालयाच्या वतीने आयोजित केले होते.

२)दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.एन.आर. पाटील (काका) यांच्या हस्ते व मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य डी. बी. पाटील व ॲड. महेश पाटील यांच्या उपस्थितीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

३) दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी संपूर्ण दिवसभर कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही शाखांमधील इयत्ता अकरावी ते पदव्युत्तर स्तरावरील सर्व वर्गांत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीचे प्रबोधनपर कार्यक्रम विद्यार्थ्यांनी संयोजन करत साजरे केले.

४) दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी बीसीएस विभागातर्फे 'बदलत्या शैक्षणिक धोरणात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा' या विषयावर प्रा. सचिन गरुड यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी प्रा. पांडुरंग मोरे व त्यांचे सर्व सहकारी तसेच विद्यार्थीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता. ज्युनिअर विभागातर्फे प्राध्यापक प्रशिक्षण वर्गांतर्गत मा. सचिन पाटील यांचे कर्मवीर अण्णांच्या जीवनाचा आढावा घेणारे व्याख्यान झाले.

५)दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी शैक्षणिक व सामाजिक विषयावर रील्स बनवणे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन प्रा.सुज्ञानी भोजकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

६)दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी कॉलेजअंतर्गत निबंध लेखनस्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये एकूण ६९ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. याचे संयोजन मराठी विभाग प्रमुख प्रा. सुजाता चोपडे त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.

७) दिनांक २५ सप्टेंबर, २०२४ रोजी वरिष्ठ विज्ञान विभागाने 'कर्मवीरांच्या आठवणी' या विषयावर मराठी विभागाचे प्रा. एकनाथ पाटील यांचे व्याख्यान संपन्न झाले. यावेळी विज्ञान विभागात प्राध्यापक आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

८) दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी कनिष्ठ विज्ञान विभागाकडून 'कर्मवीरांच्या आठवणी' या विषयावर प्रा. शंकर चव्हाण यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

९) दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी सिनिअर विभागाद्वारा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोगामअंतर्गत सर्व प्राध्यापकांसाठी प्रा. डॉ. अँडी असरीफन ( स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ मक्कासर, इंडोनेशिया) यांचे 'संशोधन व संशोधनपर जर्नल'या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आहे. या कार्यक्रमाचे संयोजन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. प्रमोद गंगनमाले यांनी केले.

१०) २७ सप्टेंबर २०२४ रोजी कर्मवीर जयंती सप्ताह सांगता समारंभामध्ये कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसेच कर्मवीर जयंती सप्ताह अंतर्गत आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ करण्यात आले आहे. या समारंभासाठी प्रसिध्द समीक्षक डॉ. रणधीर शिंदे हे प्रमुख अतिथी होते. ॲड. एन. आर पाटील यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

## भाषा आणि साहित्याच्या सामाजिक अनुबंधाचा उलगडा करणारे- एकदिवसीय हिंदी राष्ट्रीय चर्चासत्र



१. राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका).
२. बीजभाषण करताना प्रो. डॉ. अर्जुन चव्हाण.
३. प्रथम सत्रात बोलताना प्रोफेसर डॉ. हुबनाथ पांडे

दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण- इस्लामपूर मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषद आणि हिंदी विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण–इस्लामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'भाषा और साहित्य का सामाजिक सरोकार: विविध आयाम' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आणि शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेच्या नवव्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्र व अधिवेशनाचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील (काका) यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य मा. दिलीप पाटील, मा. डॉ. अनिल पाटील, प्रा. सौ. स्मिता पाटील उपस्थित होते. उद्घाटन सत्रामध्ये बीजभाषक म्हणून हिंदी साहित्याचे जेष्ठ समीक्षक, कवी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हिंदी विभागाचे पूर्व अध्यक्ष, प्रो. डॉ. अर्जुन चव्हाण व या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून राणी पार्वतीदेवी पदवी कॉलेज, तिलकवाडी बेळगाव कर्नाटकचे प्रो.विजयकुमार पाटील उपस्थित होते. या सत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे उपस्थित होते. उद्घाटन सत्रामध्ये हिंदी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. जाविद शेख यांच्या 'सायकल' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच हिंदी विभागाचे माजी विद्यार्थी डॉ. विकास पाटील यांना 'हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार' मिळालेबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. बीजभाषक डॉ. अर्जुन चव्हाण यांनी आपल्या मनोगतामध्ये प्रत्येक साहित्यकाराचा साहित्य आणि समाजाशी असणारा संबंध हिंदी कथा, कादंबरी आणि कवितांच्या माध्यमातून उलगडून दाखवला. या चर्चासत्राचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रकाश आठवले यांनी केले. आभार प्रा. डॉ. विकास पाटील यांनी मानले व सूत्र संचालन प्रा. अश्विनी थोरात यांनी केले.

प्रथमसत्राचे मुख्य वक्ता म्हणून मुंबई विद्यापीठातील हिंदी विभागातील पूर्व प्रोफेसर डॉ.हुबनाथ पाण्डे उपस्थित होते. त्यांनी साहित्यकार आपल्या अनुभवाच्या माध्यमातून समाजासाठी लेखन करतात. आपण जी बोलतो ती भाषा आहे. प्रत्येक साहित्यकाराची लिहण्याची शैली वेगवेगळी असल्याचे मत प्रकट करत स्वरचित 'ईद','आदिवासी' आणि 'हिमती लडकियाँ' या कविता सादर केल्या. या सत्राचे अध्यक्ष सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडचे प्राध्यापक डॉ. दिलीपकुमार कसबे यांनी सामाजिक अनुभवांच्या आधारे लिहिलेले साहित्यच महत्त्वपूर्ण असते, मग ते दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवाशी साहित्य, किन्नरसाहित्य, किसानसाहित्य असे कोणतेही साहित्य असो, असे वक्तव्य केले. या सत्रामध्ये विशेष उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड उपस्थित होते. या सत्राचे सुत्रसंचालक प्रा. मारुफ मुजावर हे होते. आभार प्रा. डॉ. गोरखनाथ किर्दत यांनी मानले व सूत्रसंचालन प्रा. शहिदा अत्तार यांनी केले.

समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे मुधोजी कॉलेज, फलटणचे हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. नितीन धवडे होते तर अध्यक्ष हिंदी प्राध्यापक परिषदेचे सचिव प्रो. डॉ. नाजिम शेख होते. यावेळी परिषदेच्या वतीने हिंदी विषयाच्या ज्या प्राध्यापकांची प्रभारी प्राचार्य, प्रोफेसर, पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे व ज्या विद्यार्थ्यांनी बी. ए. परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे आशा सर्वांचा सत्कार करण्यात आला. यावेळी परिषदेतील कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. सहभागी प्राध्यापकामधून डॉ. नरसिंग एकिले व दीपक जाधव यांनी आपली मनोगते व्यक्त केली. चर्चासत्राच्या समारोप सत्राचे आभार चर्चासत्राचे संयोजक प्रा. डॉ. प्रकाश आठवले यांनी मानले. सूत्रसंचालन प्रो. डॉ. वर्षाराणी सहदेव यांनी केले.

याच चर्चासत्राचे संयोजन हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रकाश आठवले, सहाय्यक प्राध्यापिका अश्विनी थोरात आणि प्रा. डॉ. जाविद शेख यांनी केले होते. या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील (काका) उपाध्यक्ष, सुनील पाटील, सचिव आदरणीय सरोज पाटील (माई), अन्य मान्यवर सदस्य व अंतर्गत गुणवत्ता हमीकक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. प्रमोद गंगनमाले यांचे मार्गदर्शन लाभले.

## कभापा कॉलेजच्या AQAR २०२३–२४ ला NAAC द्वारा मान्यता

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचा शैक्षणिक वर्ष २०२३–२४ चा वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल म्हणजे Annual Quality Assurance Report (AQAR) नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस National Assessment and Accreditation Council (NAAC- राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद.) बंगळूरू येथे सादर करण्यात आला. त्यास (NAAC) ने २७ डिसेंबर २०२४ रोजी मान्यता दिली.

याकरिता संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील (काका), उपाध्यक्ष मा. सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी मा. सरोज पाटील (माई) आणि मॅनेजिंग सदस्य संगीता पाटील तसेच संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली IQAC समन्वयक डॉ. प्रमोद गंगणमाले, सहसमन्वयक डॉ. शीला लाड तसेच कॉलेजचे सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी वृंद यांनी सामुहिकपणे वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल तयार करण्यासाठी परिश्रम घेतले.

संपादकीय

## वार्तालाप 'कर्मवीर'वार्तापत्राविषयीचा........

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे एक वार्तापत्र (कॉलेज न्यूज बुलेटिन)सुरु करण्याचे ठरले. भाऊराव पाटलांना संबोधल्या जाणाऱ्या 'कर्मवीर' या लोकप्रिय बिरुदानेच या वार्तापत्राचे नामकरण झाले.वार्तापत्राचे स्वरूप तिमाही आणि किमान चार पानांचा मजकूर या आकृतीबंधात आहे. या तिमाही अंकाचा आर्थिक ताळेबंदच हे स्वरूप ठरवत आहे, असेही स्पष्ट केले पाहिजे. तिमाही कालिक असल्याने वर्षभरात नियमित चार अंक छापून प्रकाशित होतील. एकूणात ठरल्यानुसार जुलै ते सप्टेंबरचा एक पहिला अंक प्रकाशित करून भाऊराव पाटलांच्या जयंती सप्ताहामध्ये त्याचे विमोचनही करण्यात आले आहे.

महाविद्यालयीन वार्तापात्राचा अवकाश कॉलेजमधील तसेच कॉलेजशी संबधित असलेल्या क्रियाकलापांचे नोंदीकरण करत त्यांचे वृत्तांकन करण्याचा आहे. कॉलेज कॅम्पसमधली आणि कॉलेज कॅम्पसबाहेरची पण जी कॉलेजशी संबंधित आहे अशी बातमीदारी, या महाविद्यालयीन वार्तापात्राचा गाभा असतो. या वृत्तांकनातून विवक्षित कॉलेजच्या ऐतिहासिक दस्तावेजीकरणाचे एक महत्त्वपूर्ण साधन आकाराला येते. त्यामुळे 'आजचे बातमीपत्र हे उद्याची रद्दी' अशी संकुचित समज करून घेणाऱ्यांना सांगावे लागते की आजची छापील बातमी ही उद्यासाठी रद्दी नसून उद्यासाठी कालच्या भूतकालीन घडामोडीची माहिती देणारा ज्ञानाचा स्त्रोत बनतो. अर्थात आजच्या आपल्या अध:पतित राजकीय परिवेशात 'फेक' आणि 'पेड न्यूज'ने सत्य व तथ्य असलेल्या बातमीची, विदा-माहितीची कितीही वाट लावलेली असली तरी ह्याही 'असत्याची' चिकित्सा सादर करत राहणेच जर शिक्षणाचा अंतस्त्रोत असेल तर महाविद्यालयीन वार्तापात्राची भूमिका सत्याची बूज राखणे, हीच राहील. महाविद्यालयीन क्रियाकलापांचे वस्तुनिष्ठ वार्तांकन करणे आणि ते प्रकाशित करून विद्यार्थी, प्राध्यापक आणि संबधित भागधारक आदी घटकांपर्यंत पोचवणे अशी एक प्राथमिक शृंखला तयार होते. महाविद्यालयाच्या बाहेरील नागरिकांना आणि महाविद्यालयातील सर्व भागधारकांना महाविद्यालयाच्या उपक्रमांची आणि उपलब्धींची वस्तुनिष्ठ माहिती मिळवून दिल्यानंतरच शैक्षणिक केंद्र असलेले कॉलेज आणि विद्यार्थी, प्राध्यापक आणि संबधित भागधारक यांच्यात अधिक व्यापक आणि निरोगी संवादप्रक्रियेला गती मिळू शकते.आणि यातूनच लोकशाहीपूर्ण संवादाची स्थिती निर्माण होईल. मुक्तीगामी ज्ञानाच्या शैक्षणिक घडणीसाठी असा संवाद-संपर्क प्रतिष्ठापित करणे, हाच हा 'कर्मवीर' वार्तापात्राचा मूळ हेतू आहे. भल्या प्रसिद्धीकारणातून व्यक्ती व संस्थेचे प्रतिमा वर्धन साध्य होत असले तरी आपले सम्यक चारित्र्यच जर आपली प्रतिमा बनली तर शिक्षण आणि समाजपरिवर्तन यांच्या सांधेजोडीचा एक विलक्षण प्रभावी दुवा बनू, या भूमिकेला घेऊन हे वार्तापत्र आगेकूच करणार आहे. कारण आपली संस्था क्रांतिकारी महात्मा फुले यांच्या नावाने आहे. आणि कॉलेज त्याच सत्यशोधक बाण्यास जागलेल्या 'कर्मवीर' भाऊराव पाटलांच्या नावाने याची मशागत त्यांचे वारसदार असलेल्या डॉ. एन. डी. पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मेहनतीने केली आहे, हे सर्व ज्ञात आहेच.

या इतिहासाला जागून आपल्या म. फुले शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. अॅड. एन. आर. पाटील (काका), जनरल सेक्रेटरी मा. सरोज पाटील (माई ), उपाध्यक्ष मा. सुनिल पाटील तसेच संस्थेच्या मॅनेजिग कौन्सिल सदस्य या वार्तापत्राच्या उपक्रमास पाठिंबा देत आहेत. त्याच जोडीला कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड व डॉ. संदीप पाटील, इतर अन्य सहकारी आणि अक्षय इंडस्ट्रिजची टीम यांच्या सहकार्याने या अंकाला हे मूर्तरूप साकार झाले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन



डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन करताना श्री. बीचकर व प्रा. टिबे समवेत प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ.पी.व्ही.गायकवाड, प्रा.स्मिता पाटील, प्रा. संतोष पाटील, प्रा. मिलिंद खंडेलोटे, विनायक गुरव आणि प्राध्यापक व कर्मचारी वृंद

६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना श्री. धनंजय बीचकर आणि प्रा. एन. बी. टिबे यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी म. फुले शिक्षण संस्थेचे सदस्य प्रा. स्मिता पाटील, क. भा. पा. कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ.पी.व्ही. गायकवाड, प्रा.संतोष पाटील, प्रा.मिलिंद खंडेलोटे, प्रभारी रजिस्ट्रार श्री. विनायक गुरव आणि इतर प्राध्यापक तसेच कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधान जागरूकता अभियानाचा पंधरवडा

भारतीय संविधान अमृतमहोत्सव वर्षानिमित्त भारतीय संविधान दिन २६ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर- म.फुले तसेच ६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्मृतिदिन ते १० डिसेंबर मानवी हक्क दिन या दिन शृंखलांच्या पंधरादिवसांच्या कालावधी दरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील इतिहास व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन भारतीय संविधान प्रबोधन प्रश्नावली विद्यार्थी व प्राध्यापकाकडून भरून संविधानविषयक जागरूकता निर्माण करण्याचा उपक्रम राबवण्यात आला.

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असून आपल्या संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने ही प्रबोधन प्रश्नावली तयार करण्यात आली असलेने या ऑनलाईन प्रश्नावलीत एकूण१५ प्रश्न असून त्यात भारतीय राज्यघटनेचा सरनामा,मूलभूत हक्क, कायद्यासमोर समानता, शिक्षणविषयक अनुच्छेद, घटना दुरुस्ती, ग्रामपंचायतीचा कायदा, जातिभेद व अस्पृश्यता नष्ट करण्याचे कलम, शिक्षण संस्थेतून धार्मिक शिक्षण देण्यास बंदीचा कायदा, आदीवर प्रश्नांचा समावेश करण्यात आला. सुमारे ७०० च्या आसपास विद्यार्थी व प्राध्यापकांनी ही प्रश्नावली सोडवून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड.एन.आर.पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, संस्थेचे सर्वसन्माननीय सदस्य तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील, कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी या ऑनलाईन संविधान जागरूकता उपक्रमाची प्रशंसा केली. प्रश्नावली प्रा. एस. आर. गरुड यांनी तयार केली. तांत्रिक सहाय्य डॉ. राजेश दांडगे यांनी केले. एकूण उपक्रमासाठी प्रा. सचिन गरुड, डॉ. एस. के. खडसे, डॉ. प्रकाश आठवले, प्रा. सी. जे. भारसाकळे, डॉ. प्रमोद गंगणमाले, डॉ. पी. व्ही. गायकवाड यांनी परिश्रम घेतले.



महात्मा फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना मा. सरोज पाटील (माई), मा. डॉ. अनिल पाटील तसेच प्राचार्य डॉ. नितीन शिंदे

## महात्मा फुले यांना अभिवादन

२८ नोव्हेंबर रोजी महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित महात्मा फुले यांच्या प्रतिमाशिल्पाला मालार्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याचे स्मरण करून संस्थेचे अध्यक्ष मा. अॅड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष मा. सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी मा. सरोज पाटील (माई) तसेच संस्थेचे सदस्य मा. डॉ.अनिल पाटील, क. भा. पा. कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, तसेच संस्थेतील कर्मचारी वर्ग यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन केले.

## वाचनप्रेरणा दिनाला शिवराय व मराठी अस्मितेला उजाळा



कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ग्रंथालय विभाग, मराठी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, एन.सी.सी. आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५/१०/२०२४ रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्ताने मराठी भाषा व अस्मिता यांचा जागर करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून राज्याभिषेक सोहळ्याच्या बखरीतील मजकुराचे प्रकट वाचन करण्यात आले. डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मराठी विभाग प्रमुख प्रा. सुजाता चोपडे, डॉ. प्रिती खराडे, प्रा. आर. एम. पाटील, प्रा. सुज्ञानी भोजकर, प्रा. योगिता देसाई, आदींनी सभासद बखरीतील शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या बखरीतील मजकुराचे वाचन केले. प्रा. सचिन गरुड यांनी 'शिवाजी महाराज आणि मराठी अस्मिता' यावर भाष्य केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी समाज परिवर्तन आणि वाचनचिंतन प्रक्रियेची सांगड घालण्याची आवश्यकता असल्याचे मत प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. एस. एस. चोपडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजेश दांडगे यांनी केले तर आभार डॉ. पी. एम. आठवले यांनी मानले. सदर कार्यक्रमाचे संयोजन ग्रंथपाल प्रा. अभयकुमार पाटील, ग्रंथालय सहाय्यक श्री. सागर रणदिवे आणि श्री.संदीप पाटील यांनी केले.या कार्यक्रमास ग्रंथालय समिती प्रमुख डॉ. मिलिंद देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. प्रमोद गंगणमाले, ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा. एस. बी. पाटील यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदी शोधपत्रिका 'अक्षरा' चे विमोचन



'भाषा और साहित्यका सामाजिक सरोकार: विविध आयाम' या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये उत्तरप्रदेश, झारखंड, हैद्राबाद आणि कर्नाटकमधील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी आर्दीनी सहभाग दिला. एकूण ९१ प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. ते शोधानिबंध 'अक्षरा' या आंतरराष्ट्रीय मासिक पत्रिकेमध्ये प्रकाशित करण्यात आले. १० डिसेंबर २०२४ रोजी त्या 'अक्षरा' या पत्रिकेचे विमोचन महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या जनरल सेक्रेटरी मा. सरोज पाटील (माई) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रकाश आठवले, प्राध्यापिका अश्विनी थोरात, डॉ. जाविद शेख उपस्थित होते.

## महात्मा फुले हेच खरे शिक्षक दिनाचे मानकरी

२८ नोव्हेंबर रोजी म. फुले यांच्या स्मृतिदिनानिमित पदवी व पदव्युत्तर इतिहास विभागाच्यावतीने 'म.फुले यांचे जीवनकार्य आणि त्यांच्या विचारांची प्रस्तुत' याविषयावर प्राध्यापक व विद्यार्थी यांची खुली चर्चा आयोजित करण्यात आली होती. इतिहास विभागाच्या प्रा. राजश्री सुर्यवंशी यांनी म. फुले हेच बहुजन समाजाचे खरे शिक्षक असून २८ नोव्हेंबर रोजी आपण सर्वांनी शिक्षक दिवस साजरा केला पाहिजे, असे चर्चेत मत मांडले.या चर्चेत प्रा. सचिन गरुड, विशाल कांबळे, आकांक्षा जाधव यांनीही मत मांडले.

## आर्थिक विकासात बौद्धिक संपदा अधिकाराला कळीचे महत्त्व : डॉ. एस. बी. गायकवाड

आर्थिक विकासात बौद्धिक संपदा अधिकाराला कळीचे महत्त्व आहे, याची सजग जाण अद्यापही आपल्या शिक्षण क्षेत्राला नसल्याची खंत डॉ. एस. बी. गायकवाड यांनी व्यक्त केली. ते बौद्धिक संपदा अधिकार आणि भौगोलिक मानांकन या विषयावरील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. बौद्धिक संपदा हक्क साधारणत: कॉपीराइट आणि कॉपीराइटशी संबंधित हक्क आणि औद्योगिक मालमत्तेच्या संदर्भातील हक्क अश्या दोन प्रकारात असून औद्योगिक मालमत्तेच्या चौकटीत ट्रेडमार्क आणि जीआय म्हणजे भौगोलिक संकेत मानांकन हे अधिक महत्त्वाचे आहेत. भूगोलशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी भौगोलिक मानांकनासाठी संशाधन करणे, हे नवे रोजगार आणि देशाच्या विकासासाठी अधिक गती देणारे ठरणार आहे. आपल्यातील जैव विविधता, उद्योग व शेती या क्षेत्रांना भौगोलिक मानांकनाचा संशोधनाभ्यास जोडून घेता येईल. असे महत्त्वाचे प्रतिपादन डॉ. एस. बी. गायकवाड यांनी केले. २००१ च्या पिकवाण संरक्षण आणि शेतकरी हक्क कायद्याच्या नव्या शेतीविकासातून शेतीच्या उद्योगाची पुनर्रचना करण्याच्या अनेक शक्यता आहेत. यादृष्टीतून ग्रामीणभागात शेती, जैव विविधता यांच्याशी जोडून भौगोलिक मानांकनासाठी ग्रामीणभागातील महाविद्यालयांनी काम करायला हवे, असेही त्यांनी अखेरीस अधोरेखित केले.

कभापा कॉलेजच्या पदवी व पद्व्यत्तर भूविज्ञान विभागामार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अलका पाटील होत्या भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. के. माने. व प्रा. अनिल माळी यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रास्तविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. संभाजी पाटील यांनी करुन दिला आणि आभार डॉ. एस. ए. पाटील तर सूत्रसंचालन डॉ. प्रिती खराडे यांनी केले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्राच्या वतीने कभापा कॉलेजमध्ये मा.यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सदस्य अॅड. सतीश पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, डॉ. मिलिंद देशमुख, केंद्रसंयोजक प्रा. एकनाथ पाटील, प्रा. संतोष नांगरे, डॉ. एस. के. माने, व प्रा. सी. जे. भारसकळे

२५ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारताचे माजी उपपंतप्रधान, महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ केंद्राच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील (माई) यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सुनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अॅड. सतीश पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, डॉ. मिलिंद देशमुख, केंद्रसंयोजक प्रा. एकनाथ पाटील, प्रा. संतोष नांगरे, डॉ. एस. के. माने, उपस्थित होते. प्रा. संभाजी पाटील, अभिजीत पाटील आणि विजय कांबळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## पदव्युत्तर विभागातील सहा विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत.



सुशांत देशमुख (इतिहास)



अंबिका बुरांडे (इतिहास)



राज्यश्री सूर्यवंशी (इतिहास)



अमोल शिंदे (अर्थशास्त्र)



मोहिनी पाटील (अर्थशास्त्र)



सानिया पटेल (इंग्लिश)

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील इतिहास, अर्थशास्त्र व इंग्लिश या विषयातील पदव्युत्तर विभागातील एम. ए. भाग-२ चे एकूण सहा विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभाग गुणवत्ता यादीत चमकले आहेत. इतिहास विषयाचे एम. ए. भाग-२ या वर्गातील सुशांत देशमुख याने चौथा, अंबिका बुराडे हिने सातवा तर राज्यश्री सूर्यवंशी हिने दहावा क्रमांक तर अर्थशास्त्र विभागातील एम. ए. भाग-२ चे विद्यार्थी अमोल अविनाश शिंदे व मोहिनी महादेव पाटील या विद्यार्थ्यांनी अनुक्रम पाचवा आणि दहावा क्रमांक तसेच इंग्लिश विषयातील एम. ए. भाग-२ ची सानिया सरदार पटेल हिने आठवा क्रमांक प्राप्त करुन उज्वल शैक्षणिक यश प्राप्त केले आहे. इतिहास विभागप्रमुख व पदव्युत्तर समन्वयक प्रा. सचिन गरुड, प्रा. मनीषा पाटील, प्रा. किरण चौगुले यांचे इतिहासाच्या विद्यार्थ्यांना तर अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. संतोष नांगरे, प्रा. भाग्यश्री पाटील, व प्रा. रणजितसिंह चव्हाण तसेच इंग्लिश विषयाच्या विद्यार्थ्याला इंग्लिश विभागप्रमुख डॉ. प्रमोद गंगणमाले, डॉ. बी. ए. सावंत, डॉ. राजेश दांडगे, प्रा. एन. एम. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभाग गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अॅड. एन. आर. पाटील (काका) जनरल सेक्रेटरी सरोज पाटील (माई), उपाध्यक्ष मा. सुनील पाटील तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील तसेच कॉलेजचे प्राध्यापकवृंद यांनी अभिनंदन केले.

## मानसिक आरोग्य सुधारण्यावर भर देणे आवश्यक : डॉ. मिलिंद देशमुख



जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसशास्त्र विभागात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन करताना उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, सोबत डॉ. मिलिंद देशमुख आणि इतर

'एकविसावे शतक मोठ्या ताणतणावाचे शतक आहे. दिवसेंदिवस मानसिक आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. आज आपण जगत असलेल्या जीवनशैलीचा तो विपरीत परिणाम आहे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे लोकांचे मानसिक आरोग्य बिघडत चालले आहे. या समस्या कमी करायच्या असतील, तर योग्य त्या उपाययोजनांच्या आधारे मानसिक आरोग्य सुधारण्यावर भर दिला पाहिजे.' असे प्रतिपादन डॉ. मिलिंद देशमुख यांनी केले. दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील मानसशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड होते. रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरवात झाली.यावेळी बोलताना डॉ गायकवाड म्हणाले, मानसिक ताणतणावाचे दाब आपल्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यवर येतात. तरुण वयातल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करियरवर तर त्याचे विपरीत परिणाम होतात. विद्यार्थ्यांनी अशा तणावाचे व्यवस्थापन करायला शिकले पाहिजे.' यावेळी प्रा.इशा शहा, मयुरी पवार आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ. माने व श्री बामणे यांना पुरस्कार





महा.अंनिसचा 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र'चा राज्यस्तरीय कार्यकर्ता आधारस्तंभ पुरस्कार श्री. शशिकांत बामणे आणि डॉ.एस. के. माने यांना प्रसिद्ध मराठी कवयित्री नीरजा याचे हस्ते प्रदान.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' चा 'राज्यस्तरीय कार्यकर्ता आधारस्तंभ पुरस्कार' आपल्या कॉलेजमधील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे इस्लामपूरचे कार्याध्यक्ष डॉ. एस. के. माने आणि प्रशासकीय कर्मचारी श्री. शशिकांत बामणे यांना प्राप्त झाला. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक वडघर जि. रायगड येथे प्रसिद्ध मराठी कवयित्री नीरजा याचे हस्ते दोघांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## बुद्धिजीवी वर्गाने आहार शैलीत बदल करणे आवश्यक: डॉ. राहुल नाकील



डिजिटल आपद्वारा आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. राहुल नाकील.(लोकनेते राजारामबापू पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, इस्लामपूर) मंचावर उपस्थित डॉ. दिपाली पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे. उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, IQAC समन्वयक डॉ. प्रमोद गंगणमाले.

बुद्धिजीवी वर्गाची जीवनशैली कष्टकरी वर्गापेक्षा भिन्न आहे, त्यामुळे मानसिक व शारीरिक आरोग्य जपण्यासाठी या वर्गाला आहार शैलीत बदल करणे आवश्यकआहे, असे प्रतिपादन डॉ. राहुल नाकील यांनी येथील आरोग्य शिबिरात व्यक्त केले.

म. फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये हेल्थ सेंटर आणि राष्ट्रीय सेवायोजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष- मंत्रालय भारत सरकार अंतर्गत डिजिटल अॅपद्वारा आरोग्य तपासणी शिबिर (आयुर्वेदिक प्रकृती परीक्षण) आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात डॉ. राहुल नाकील आणि डॉ. दिपाली पाटील यांनी प्राध्यापक समूहाला संबोधित करून आपल्या टीमद्वारे आरोग्य तपासणी केली. डॉ. दिपाली पाटील यांनी आयुर्वेदिक उपचारपद्धतीवर माहिती दिली. डॉ. राहुल नाकील यांनी बुद्धिजीवी वर्गाने मानसिक ताण कमी करण्यासाठी दैनंदिन शास्त्रीय व्यायामाची गरज असून शारीरिक आरोग्यासाठी नियमित तपासणी व पथ्ये पाळणे आवश्यक आहे, असे मत मांडले.


## ग्रामीण विद्यार्थ्यांनी कॅम्पस प्लेसमेंटची गांभीर्याने तयारी करावी : अमर शिंदे



वाणिज्य आणि अर्थशास्त्र विभाग संयुक्त विद्यमाने प्लेसमेंट विभागामार्फत एकदिवसीय प्लेसमेंट मार्गदर्शन कार्यशाळा: विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अमर शिंदे (जी. टेक.जैन कराड)

शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण विद्यार्थी कॅम्पस प्लेसमेंटमध्ये मागे पडतात. त्याला अनेक कारणे आहेत पण या विद्यार्थ्यांनी अगदी फोकस्ड तयारी केल्यास अनेक कंपन्यात त्यांना संधी मिळू शकते, असे मत जी. टेक. जैन कराडचे अमर शिंदे यांनी व्यक्त केले.९ ऑक्टोबर २०२४ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर वाणिज्य आणि अर्थशास्त्र विभाग संयुक्त विद्यमाने प्लेसमेंट विभागामार्फत आयोजित केलेल्या एकदिवसीय प्लेसमेंट मार्गदर्शन कार्यशाळेत ते विद्यार्थ्यांना प्लेसमेंटविषयी मार्गदर्शन करत होते. कॅम्पस प्लेसमेंटसाठी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी अनेक चाचण्यांची तयारी करावी लागते, याविषयी मार्गदर्शन करत कॉलेजच्या कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरी व रोजगार मिळाल्यास करियरला योग्य दिशा मिळते असे अमर शिंदे यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. एस. आर. नांगरे यांनी केले. कभापा कॉलेजच्या कॅम्पस प्लेसमेंटची प्रा. सी. जे. भारसकळे यांनी तपशीलवार माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले.

## प्राध्यापकांनी संशोधनाच्या नवनवीन वाटा शोधाव्यात : मा. सरोज पाटील



डॉ. सुमन सावंत यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. नितीन शिंदे सोबत प्रा. संतोष नांगरे, डॉ. एस. के. माने, डॉ. महेश गोखले, डॉ. संदेश जिरगे, डॉ. उमेश मोटे, डॉ. प्रकाश चव्हाण, प्रा. सागर पारधी व श्री. वंजारी

प्राध्यापकांनी संशोधनाच्या नवनवीन वाटा शोधाव्यात असे प्रतिपादन म. फुले शिक्षणसंस्थेच्या सचिव मा. सरोज पाटील यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील भौतिकशास्त्र विषयाच्या प्रा. सुमन सावंत यांना पीएच.डी. प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार घेण्यात आला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. शिवाजी विद्यापीठाकडून प्रा. सुमन सावंत यांनी इंटरॅक्शन ऑफ आयोनायझिंग रेडिशन ऑन आरजीओ नॅनोकंपोसिट फॉर सुपरकॅपॅसिटर अॅप्लीकेशन या विषयावर संशोधन करुन पीएच.डी. प्राप्त केली आहे. त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

## इस्लामपूर येथील नाट्य उत्सवात 'कर्मवीर'च्या एकांकिकेचे सादरीकरण



१०० अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त येथे झालेल्या तीन दिवसीय नाट्य उत्सवात कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या सांस्कृतिक विभागाने बसवलेल्या 'आब्रूभर' या एकांकिकेचे सादरीकरण झाले. ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते कलावंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या एकांकिकेत तनुश्री वाघमारे, सायली जाधव, वेदिका कामत, प्रतीक्षा गावडे, प्राची वाघमारे, संहिता पाटील, गायत्री सूर्यवंशी, श्रेया माळी, प्राजक्ता सूर्यवंशी या विद्यार्थिनी कलाकारांनी भूमिका निभावल्या आहेत. एकांकिकेचे लेखन कॉलेजचे माजी विद्यार्थी राहुल जगताप याने केले आहे. सुदर्शनी कोडग यांनी दिग्दर्शन केले तर प्रणव कचरे याची प्रकाशयोजना आहे. सूरज तिवारी याने पार्श्वसंगीत दिले आहे. नेपथ्य पृथ्वीराज सूर्यवंशी याचे आहे. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. संदीप पाटील आणि जगन्नाथ नांगरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. संस्थेचे अध्यक्ष अॅड. एन. आर. पाटील, सचिव सरोज पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी अभिनंदन केले.

खेळ खेळीया.....

# कभापा कॉलेजच्या मैदानात सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेचा जल्लोष



सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धा जिंकलेल्या कॉलेजच्या संघासोबत प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, प्रा. अजित पाटील, डॉ. अमितराज माने, प्रा. कमलेश ठाकरे व इतर मान्यवर

दि.१४ व १५ ऑक्टोबर २०२४ रोजी इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय पुरुष व्हॉलीबॉल स्पर्धेस सुरुवात झाली. स्पर्धेचे उद्घाटन महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. एन. आर. पाटील (काका) यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण-इस्लामपूरचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या प्रा. सौ. स्मिता पाटील, वाळवा तालुका क्रीडा अधिकारी श्री. जमीर आत्तार, कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. गायकवाड, सांगली विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा. अजित पाटील, ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे, कॉलेजचे प्रभारी रजिस्ट्रार श्री. विनायक गुरव, त्याचबरोबर सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. अमितराज माने, प्रा. कमलेश ठाकरे यांनी संपूर्ण स्पर्धेचे यशस्वी संयोजन केले.या स्पर्धेमध्ये एकूण १० संघाचा सहभाग राहीला. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांचे हस्ते झाले. त्यांनी यावेळी उपप्राचार्य डॉ. पी.व्ही. गायकवाड, सांगली विभागीय क्रीडापरिषदेचे सचिव प्रा. अजित पाटील, ज्युनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे, कॉलेजचे प्रभारी रजिस्ट्रार श्री. विनायक गुरव, त्याच बरोबर सांगली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षणसंचालक उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांना कॉलेजच्यावतीने ट्रॉफी देण्यात आल्या. तर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व पंचांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेतून विजयी झालेले संघ पुढीलप्रमाणे -

१ ) कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर - प्रथम क्रमांक २ ) अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा - द्वितीय क्रमांक ३ ) डॉ. पतंगराव कदम आर्ट्स व कॉमर्स महाविद्यालय, रामानंदनगर- तृतीय क्रमांक ४) वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली- चतुर्थ क्रमांक.

## प्रथमेश दमामे आणि समर्थकरे यांची राज्य स्तरीय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड



प्रथमेश दमामे व समर्थ करे या खेळांडूचा सत्कार करताना महात्मा फुले शिक्षण संस्थेचे सदस्य ॲड. सतीश पाटील आणि मा. प्रशांत वाजे. समवेत प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे व इतर मान्यवर.

इयत्ता १२ वीचे विद्यार्थी प्रथमेश मुकुंद दमामे व समर्थ सर्जेराव करे या दोन खेळाडूंची बुलढाणा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, प्राचार्य डॉ. एन. एस. शिंदे, उप-प्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, ज्युनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे यांनी त्यांचे अभिनंदन केले.संस्थेचे सदस्य ॲड. सतीश पाटील आणि मा. प्रशांत वाजे यांच्या हस्ते दोन्ही गुणवंत खेळाडूचा सत्कार करण्यात आला. या खेळाडूना जिमखाना वभागाचे डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे, अजित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले आहे .

## विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत के. बी. पी. कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद



सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली विभागीय पुरुष व महिला बॉक्सिंग स्पर्धेत इस्लामपूरच्या के. बी. पी. कॉलेजच्या खेळाडूंनी विविध वजनीगटामध्ये सहभाग घेऊन प्राविण्य मिळवले. सदर स्पर्धेची पुरुष व महिला या दोन्ही विभागीची जूरल चॅम्पीयनशिप केबीपी कॉलेजला मिळाली. या स्पर्धेतून या संघाची शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय-बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली. वरदराज पृथ्वीराज चव्हाण (६३ ते ६७ किलो वजनगट-सुवर्णपदक ), आकाश विठ्ठल कारंडे (४६ ते ५१ किलोवजनगट - सुवर्णपदक), प्रथमेश प्रकाश मोरे, कु. स्वालेहा हारूण मुजावर, कु. संचिता मद्दाप्पा इरकर, कु. स्नेहल शांताराम माळी (४६ ते ५१ किलोवजन गट-सुवर्णपदक), कु.वैष्णवी अमोल सावंत (७५ते ८१ किलोवजनगट-सुवर्णपदक),श्रवण अनिल नागे (८० ते ८५ किलोवजन गट - रौप्यपदक) तसेच प्रज्योत संदीप पाटील (५१ ते ५४ किलो वजन गट-रौप्यपदक) या एकूण प्राविण्य प्राप्त विद्यार्थी-खेळाडूंची आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल आणि त्यांच्या या यशाबद्दल महात्मा फुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन.आर.पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जूरल सेक्रेटरी सरोज पाटील, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील, कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे व प्रा.अजित पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

## श्रेया पाटीलला राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत रौप्य पदक



श्रेया पाटीलचे अभिनंदन करताना मा. सरोज पाटील, मा. ॲड. सतीश पाटील, प्राचार्य डॉ नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, मा. डॉ. मिलिंद देशमुख, जिमखाना विभागाचे डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील इयत्ता ११ वी ची विद्यार्थिनी श्रेया धनंजय पाटील हिने गुजरात येथे संपन्न झालेल्या १९ वर्षाखालील राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या सांघिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील, ज्युनियर विभागाचे उपप्राचार्य प्रा. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच जिमखाना विभागाचे डॉ.अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे, अजित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## क.भा.पा. कॉलेजला सांगली विभागीय हँडबॉल स्पर्धेत विजेतेपद



हॅन्डबॉलच्या खेळाडूंच्या सत्कार प्रसंगी कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे समवेत उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, डॉ. प्रमोद गंगनमाले, प्रा. एस. आर. नांगरे, जिमखाना विभागाचे प्रा. डॉ. अमितराज माने प्रा. के.आर. ठाकरे व श्री.अनिल कोळी.

महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने सांगली येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठअंतर्गत सांगली विभागीय पुरुष हँडबॉल स्पर्धेत विजेतेपद मिळवले आहे. गतवर्षीही या स्पर्धेचे विजेतेपद क.भा.पा. कॉलेजनेच मिळवले होते. स्पर्धेचा अंतिम सामना क.भा.पा. कॉलेजविरुद्ध कला वाणिज्य व सायन्स कॉलेज पलूस यांचेमध्ये झाला. हा सामना क.भा.पा.कॉलेजने पाच गुणांच्या फरकाने जिंकला. राठोड ऋषिकेश रामदास, यमगर शुभम संतोष, चव्हाण साहिल मोहन, तांबट संकेत जोतीराम, चौगुले दत्तात्रय बजरंग, लाड ओमकार अनिल, कचरे प्रणव बाबासो, मोरे प्रथमेश प्रकाश, ओतारी प्रथमेश संतोष, जाधव प्रमोद बबन, धज अथर्व श्रीकांत, देसाई संस्कार सचिन, पाटील प्रशांत तानाजी, जाधव अर्जुन दिलीप, कोरे निलेश राजकुमार या हँडबॉल संघातील विद्यार्थी खेळांडूनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेतून क.भा.पा.च्या या संघाची निवड शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय हँडबॉल स्पर्धेसाठी झाली आहे. त्यांच्या या सुयशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील, उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील, कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.जिमखाना विभागाचे डॉ.अमितराज माने, प्रा.के.आर.ठाकरे व अजित पाटील यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

## दिशा पाटीलची शिवाजी विद्यापीठ शुटिंग संघात निवड



महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजची विद्यार्थीनी कु.दिशा राजेंद्र पाटील हिची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. कोल्हापूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविद्यापीठ शुटिंग स्पर्धेत तिने २५ मीटर पिस्टलमध्ये प्रथम क्रमांक व १० एयर पिस्टल प्रकारात द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेतून पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे ५ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, डॉ. संदीप पाटील प्रा. संतोष पाटील, कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी तिचे अभिनंदन केले. प्रा. डॉ. अमितराज माने, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांनी तिला मार्गदर्शन केले.

## कर्मवीर प्रबोधिनीचे ३३ विद्यार्थी उपनिरीक्षकपदी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या अंतिम निकाला - मध्ये कर्मवीर स्पर्धा परीक्षा प्रबोधिनीच्या ३३ विद्यार्थ्यांची निवड झाली.निवड झालेल्या यादीमध्ये अनिकेत वाडकर (दिंडनेर्ली), बिरदेव पाटील (गुंडेवाडी), राहुल पाटील (येडेनिपाणी),विशाल पवार(हुबालवाडी),धनाजी शेळके, प्रदीप शेळके (पुनवत),विश्वजीत गोतपागर (कुंडल),संदीप माळी (देवराष्ट्रे),अजय लोटके (कुंडल), भागेश गुंडाळे (तळंदगे),संकेत सदलगे (शिवांकवाडी), महेश गस्ते (आष्टा),अक्षय पाटील (लाटवडे),अक्षय पाडेकर (अहमदनगर), राहुल काईत (नवेखेड),रविकुमार रुमाले (नांदेड),वसंत थोरात (बीड), प्रदीप शिंगाडे(बेडग),विवेक कारंडे (वारणानगर),तुषार निकम (निकमवाडी), प्रतिक बोंद्रे (कासारशिरंबे),सृष्टी कदम (वाळवा), प्रियांका खाडे (माळेवाडी) सोनाली घोरपडे (कागल),मोनिका पाटील (कुठरे),किरण पाटील (नेर्ले), हिना मुल्ला, शुभांगी साठे (रेठरेहरणाक्ष),स्नेहल ढाळे (नागठाणे),प्रणाली पाटील (कामेरी), अंकिता कारंडे (ढवळेश्वर), तेजस्विनी माणगांवे (नागाव),स्वरांजली नलवडे (वायफळे) या विद्यार्थ्यांची नावे आहेत.

संस्थेचे अध्यक्ष ॲड.एन.आर.पाटील,उपाध्यक्ष सुनिल पाटील, जनरल सेक्रेटरी सरोज पाटील, प्राचार्य डॉ.नितीन शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.सनदी अधिकारी अल्ताफ शेख,प्रांताधिकारी प्रमोद चौगुले,तहसिलदार राकेश गिड्डे,पोलीस उपनिरीक्षक भूषण माने,मुख्याधिकारी प्रतीक थोरात,प्रा.विनायक पाटील,प्रा.विकास गिड्डे,प्रा.प्रविण बुचडे,तसेच केंद्र संचालक प्रा.अजितकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

' कर्मवीर वार्ता' त्रैमासिकाचा सदरचा अंक महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजकरिता संपादक प्रा. सचिन गरुड यांनी संपादित केला आहे. प्रकाशक प्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी अक्षय इंडस्ट्रिज, एम.आय.डी.सी.,इस्लामपूर (जि.सांगली) येथून छापून घेतला आणि कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वहे रोड, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली येथून प्रकाशित केला आहे.
अंकात प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाच्या अधीन. (फक्त खाजगी वितरणासाठी)